MHKO070004792003

**<u>नियमित दिवाणी दावा क्र.०३/२००३ मधील नि.क्र.२३१ वर आदेश</u>**

**<u>(तुळजगोंडा पाटील, वगैरे –विरुध्द– दादासाहेब पाटील, वगैरे )</u>**

१. वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.९ शांताबाई आण्णासो पाटील यांचे वारस अभिलेखावर घेण्यास परवानगी मिळणेबाबत दाखल केलेला आहे.

२. वादी यांचे कथन असे की, प्रस्तुत दाव्यातील प्रतिवादी क्र.९ शांताबाई आण्णासो पाटील या दि.१६/०३/२०२२ रोजी मयत झाले असून त्यांना पुढीलप्रमाणे सरळ व कायदेशीर वारस आहेत –

| अ.नं. | वारसांचे नावे व पत्ता | मयताशी नाते |
|---|---|---|
| ९–१ | **श्री.आण्णासाहेब शंकर पाटील,**<br>व.व.७५, धंदा–शेती, रा.दत्त कारखान्याजवळ,<br>शिरोळ, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर. | पती |
| ९–२ | **श्री.सुधीर आण्णासो पाटील,**<br>व.व.५०, धंदा–शेती, रा.दत्त कारखान्याजवळ,<br>शिरोळ, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर. | मुलगा |
| ९–३ | **श्री.सुनिल आण्णासो पाटील (मयत)**<br>**मयत वारस –** | मुलगा |
| ९–३–१ | **श्रीमती सविता सुनिल पाटील,**<br>व.व.४५, धंदा–शेती, रा.दत्त कारखान्याजवळ,<br>शिरोळ, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर. | सुन |

९-३-२ **श्री.शिवराज सुनिल पाटील,** नातू
व.व.२५, धंदा-शेती, रा.दत्त कारखान्याजवळ,
शिरोळ, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर.

९-३-३ **कु.शिवानी सुनिल पाटील,** नात
व.व.२२, धंदा-शेती, रा.दत्त कारखान्याजवळ,
शिरोळ, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर.

येणेप्रमाणे प्रतिवादी क्र.९ यांना सरळ व कायदेशीर वारस असून त्यांच्या शिवाय अन्य कोणीही वारस आहेत असे प्रतिवादी यांचे म्हणणे असल्यास सदर वारस रेकॉर्ड वर घेणेचे हक्क राखून ठेवून वादी यांनी हा अर्ज दिलेला आहे. सदर वारसांवर राईअ टु सुट सरव्हाईव्ह होत असलेने सदर वारस रेकॉर्डवर घेणे अत्यावश्यक व न्यायाचे असल्याने सदर वारस रेकॉर्डवर घेणेसाठी व तशी दावेत दुरुस्ती करणेकरीता परवानगी मिळावी अशी विनंती वादी यांनी केली आहे.

३. प्रतिवादी यांना पुरेश संधी देवूनही त्यांनी प्रस्तुत अर्जावर त्यांचे म्हणणे दाखल केले नसल्याने प्रस्तुतचा अर्ज त्यांच्या म्हणण्याविना चालवण्यात आला.

४. प्रकरणातील कागदपत्रे पाहिली तसेच वादीतर्फे वकीलांचा युक्तीवाद ऐकला. वादी यांनी प्रस्तुतचा दावा हा हक्कज्ञापन वाटपासाठी व पृथक कब्जासाठी दाखल केला आहे. वादी यांनी प्रतिवादी क्र.९ शांताबाई आण्णासो पाटील यांच्या मृत्यू दाखल्याची साक्षांकित प्रत निशाणी क्र.२२७ वरील वर्णनयादीसोबत दाखल केलेली आहे. त्याचे अवलोकन करता प्रतिवादी क्र.९ शांताबाई आण्णासो पाटील हे दि.१६/०३/२०२० रोजी मयत झाल्याचे दिसुन येते. वादी यांनी निशाणी क्र.१२९ व १३० कडे प्रतिवादी क्र.९ चे वारस अभिलेखावर घेण्यासाठी झालेला विलंब माफ होवून मिळणेकरीता व अबेटमेंट सेट असाईड होणेकरीता दिलेले अर्ज मंजूर करण्यात आलेले आहेत. अर्जदार यांनी मयत प्रतिवादी क्र.९ शांताबाई आण्णासो पाटील यांना प्रस्तुत अर्जात नमुद केलेल्या व्यक्ती वारस असलेचे शपथेवर कथन केले आहे. दाव्याचे स्वरुप पहाता सदर वारसदारांचा दावा चालवण्याचा अधिकार टिकून रहात असलेचे स्पष्ट होत

आहे. प्रतिवादी क्र.९ शांताबाई आण्णासो पाटील यांचे वारस म्हणून प्रस्तुत दावेकामी प्रतिवादी म्हणून पक्षकार करणे आवश्यक आहे. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश करीत आहे.

**– आदेश –**

१. प्रस्तुतचा अर्ज (नि.क्र.२३१) मंजूर करण्यात येतो.

२. वादी यांना मयत प्रतिवादी क्र.९–शांताबाई आण्णासो पाटील यांचे वारस या नात्याने मागणीप्रमाणे **प्रतिवादी क्र.९–१) श्री.आण्णासाहेब शंकर पाटील, क्र.९–२) श्री.सुधीर आण्णासो पाटील, क्र.९–३) श्री.सुनिल आण्णासो पाटील मयत तर्फे वारस ९–३–१) श्रीमती सविता सुनिल पाटील, क्र.९–३–२) श्री.शिवराज सुनिल पाटील आणि ९–३–३) कु.शिवाजी सुनिल पाटील** म्हणून दाव्यामध्ये समाविष्ठ करण्याची परवानगी देण्यात येते.

३. वादी यांनी मुळ दाव्यामध्ये योग्य ती दुरुस्ती पुढील तारखेला किंवा त्यापूर्वी करावी आणि सुधारीत वादपत्र दाखल करावे.

Digitally signed by ROHINI ASHOK JADHAV
Date: 2022.12.14 18:34:40 +0530

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

दिनांक : १४/१२/२०२२
ठिकाण : जयसिंगपूर.

**(रोहिणी अ. जाधव)**
२ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर)
जयसिंगपूर.